| | |
|---|---|
| MHRT030006902026 | **फौजदारी किरकोळ अर्ज क्रमांक १५८/२०२६**<br>**सिध्देश पांडुरंग आंबेरकर**<br>**वि.**<br>**महाराष्ट्र शासन** |

## निशाणी क्र.०१ वरील आदेश
## (घोषित दिनांक १८/०६/२०२६)

अर्जदार **सिध्देश पांडुरंग आंबेरकर** यांनी भारतीय नागरी सुरक्षा संहिता कलम ५०३ प्रमाणे रत्नागिरी ग्रामीण पोलीस स्टेशन गुन्हा रजिस्टर क्रमांक ७१/२०२६, [भारतीय न्याय संहिता कलम ३३१ (४), ३०५] या कलमान्वये दाखल असणाऱ्या गुन्ह्यामध्ये जप्त करणेत आलेली टीव्हीएस कंपनीची लाल व काळया रंगाची एन्टॉर्क१२५ दुचाकी गाडी क्र.एम.एच.०८/बी.एल./०४८४ (संक्षिप्तेकरिता “जप्त वाहन”) ही गाडी परत मिळण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे. या वाहनाचे सविस्तर वर्णन अर्ज निशाणी क्रमांक ०१ परिच्छेद क्र.१ मध्ये केले आहे.

२. अर्जदारच्या कथनानुसार, सामनेवाला यांनी अर्जदार यांचे मालकीची दुचाकी गाडी टीव्हीएस कंपनीची लाल व काळया रंगाची एन्टॉर्क१२५ जप्त करुन ती पोलिस ठाण्याच्या आवारामध्ये उघड्यावर ठेवलेली आहे. तसेच सदरचे वाहन हे अशाच प्रकारे उघड्यावर ठेवण्यात आल्यास प्रस्तुत वाहनावर विपरित परिणाम होवून गंज लागण्याची, नादुरुस्त होण्याची व दुचाकी गाडीचे काही भाग निकामी होण्याची शक्यता आहे. प्रस्तुतचे वाहन हे अर्जदाराचे मालकीचे असून अन्य कोणाचाही, कसलाही संबंध नाही. प्रस्तुत वाहन हे अर्जदार यांचे दळणवळणाचे व व्यवसायाचे एकमेव साधन असून ती त्यांच्यासाठी गरजेची आहे. त्यामुळे जप्त वाहन हे अर्जदार याच्या स्वतःच्या मालकीची असल्याने तो अर्जदार यास परत मिळणेकरीता अर्जदाराने अर्ज दाखल केला आहे.

३. तपासिक अंमलदार यांनी निशाणी क्र.०५ वर त्याचे लेखी म्हणणे सादर केलेले आहे. त्यामध्ये त्यांनी प्रस्तुत अर्जातील दुचाकी गाडी जप्त केल्याचे व त्यांच्या ताब्यात असल्याचे कथन केले आहे. तसेच जप्त वाहन अर्जदारास परत दिले तर ते पुन्हा जप्त वाहन मालमत्तेसंदर्भात इतर गुन्हे करण्यासाठी वापरु शकतात. तसेच जप्त वाहन

परस्पर विक्री करु शकतात किंवा न्यायालयाला आवश्यकता असेल त्यावेळेस जप्त वाहन न्यायायालयात हजर करणार नाही त्यामुळे त्यांनी अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली.

४. प्रस्तुत प्रकरणात सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी निशाणी क्र.७ वर त्यांचे लेखी म्हणणे सादर करुन प्रस्तुतचा अर्ज कायदयाने चालणारा नाही. अर्जदार हा सराईत गुन्हेगार आहे तसेच अर्जदार हा स्थानिक रहिवासी नसल्यामुळे न्यायालयीन कामासाठी हजर राहणार नाही. तसेच जप्त वाहन न्यायालयासमक्ष आवश्यक असेल तेव्हा हजर ठेवणार नाही व परस्पर विक्री करेल. त्यामुळे त्यांनी सदरचा अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली आहे.

५. अर्ज, म्हणणे व अभिलेख पाहिला. अर्जदार तर्फे विधिज्ञ व सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांचा युक्तीवाद ऐकला.

६. अर्जदाराने सदर अर्जासोबत गु.र.नं.७१/२०२६ चे रिमांडची कागदपत्रे व त्यावरील आदेश, लर्निंग लायसन्स, वाहनाचा विम्याचे कागदपत्रे, आर.सी. बुक, गाडी खरेदीचे इनवाईस पावती व स्वतःचे आधारकार्डचे प्रमाणित प्रती दाखल केलेले आहेत.

७. सादर केलेल्या कागदपत्रावरुन सदरची गाडी ही अर्जदार यांच्या मालकीची असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. सदर वाहन हे पोलीसांनी या गुन्ह्यात जप्त केली असल्याची बाब वादातीत नाही. या वाहनाचा ताबा मिळण्यासाठी अन्य कुणीही अर्ज केलेला नाही. त्याचप्रमाणे अर्जदाराने सादर केलेल्या वर नमुद कागदपत्रांवरुन अर्जदार यांचे नाव सदर वाहनाच्या मालकी सदरी नमुद असल्याचे दिसून येते. त्यामुळे अर्जदार हे सदर वाहनाचा अंतरीम ताबा मिळण्यास पात्र असल्याचे दिसते. तसेच सद्य परिस्थीतीत अभियोगपक्षातर्फे व तपासिक अधिकारी यांनी घेतलेला कोणताही आक्षेप हा अर्ज नामंजुर करण्यास पुरेसा नाही.

८. भारतीय नागरी सुरक्षा संहिता कलम ५०३ चे अवलोकन केले असता त्यामध्ये जप्त मुद्देमालासंदर्भात फौजदारी न्यायालयासमोर हक्कदार असलेली व्यक्ती जप्त मुद्देमाल सुपुर्तनाम्यावर योग्य त्या अटी शर्तीवर मागू शकते. तसेच प्रस्तुत कलमामध्ये चौकशी किंवा संपरिक्षेत जप्त मालमत्ता फौजदारी न्यायालयासमोर आणली गेली नसेल,

तेव्हा त्या मालमत्तेची विल्हेवाट करणे किंवा त्याच्या कब्जास हक्कदार असलेल्या कोणत्याही व्यक्तीकडे त्याची सुपुर्तगी करणे याबाबत आदेश देऊ शकत असल्याचे नमुद आहे. तपासिक अधिकारी यांनी अद्यापपर्यंत सदर अपराधाचे दोषारोपपत्र दाखल केलेले नाही. त्यामुळे सदर अपराधाचा निकाल लागण्यासाठी जास्त वेळ लागणार आहे. त्यामुळे मी, मा. सर्वोच्च न्यायालयाचे **सुंदरभाई अंबालाल देसाई वि. गुजरात सरकार (२००२) १० एस.सी.सी २८३** या न्यायनिवाडयाचे अवलोकन करुन व सदर न्यायनिवाडयामध्ये मा. सर्वाच्च न्यायालयाने दिलेले निर्देश गृहित धरुन व अभिलेखावरील संपूर्ण परिस्थितीचा विचार केल्यानंतर माझ्या माहितीप्रमाणे जप्त केलेला मुद्देमाल संबंधीत पोलीस ठाण्यात विनाकारण ठेवणे न्यायोचित होणार नाही अशा निष्कर्षाप्रत येत आहे.

९. या सर्व परिस्थितीचा विचार करता अर्जदाराने मागणी केलेले वाहन टीव्हीएस कंपनीची लाल व काळया रंगाची एन्टॉर्क१२५ दुचाकी गाडी क्र.एम.एच.०८/बी.एल./०४८४ हे अर्जदाराच्या ताब्यात काही अटी व शर्तीवर देणे योग्य होईल. म्हणून मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे–

| आ दे श | |
|---|---|
| १. | पोलिस निरीक्षक, रत्नागिरी ग्रामीण पोलिस ठाणे/तपासी अधिकारी, (गुन्हा रजिस्टर नंबर ७१/२०२६) यांना निर्देशित करण्यात येते की, सदर गुन्ह्यामध्ये मध्ये जप्त करणेत आलेले वाहन टीव्हीएस कंपनीची लाल व काळया रंगाची एन्टॉर्क१२५ दुचाकी गाडी क्र.एम.एच.०८/बी.एल./०४८४ हे अर्जदारास रक्कम रु.६०,०००/– (रुपये साठ हजार मात्र ) चे हमीपत्र दिल्यानंतर परत देण्यात यावे. |
| २. | अर्जदाराने प्रकरणाच्या चौकशीसाठी वरील नमुद वाहनाची आवश्यकता असल्यास ती न्यायालयापुढे हजर करावी. |
| ३. | अर्जदाराने जप्त वाहन ताब्यात मिळाल्यानंतर या खटल्याचा अंतिम निकाल लागेपर्यंत ती कोणालाही विकू नये अथवा त्यामध्ये कोणताही बदल करु नये. अन्य व अशा प्रकारच्या कोणत्याही गुन्ह्यात सदर वाहनाचा वापर करु नये. |

| | |
|---|---|
| **४.** | सदर मुद्देमालाचा मे. न्यायालयास जेव्हा जेव्हा चौकशीकामी आवश्यकता असेल तेव्हा तेव्हा सदरचा मुद्देमाल अर्जदाराने न्यायालयात स्वखर्चाने हजर करावे. |
| **५.** | तसेच तपासी अधिकारी यांनी सदर जप्त वाहन अर्जदारास परत करण्यापूर्वी चार बाजूंनी छायाचित्र काढून त्याबाबत पंचनामा करावा. असा पंचनामा, छायाचित्र त्यांचे योग्य त्या प्रमाणपत्रासह व अर्जदाराने दिलेल्या हमीपत्रासह या न्यायालयात दोषारोप पत्रासोबत दाखल करावा. |
| **६.** | या प्रकरणातील कागदपत्रे रत्नागिरी ग्रामीण पोलीस स्टेशन, रत्नागिरी मधील गुन्हा रजिस्टर नंबर ७१/२०२६ सोबत ठेवण्यात यावेत. |
| **७.** | प्रस्तुतचा आदेश तपासी अधिकारी यांना कळविण्यात यावा. |

SHABNAM YUNUS SHAIKH
Digitally signed by SHABNAM YUNUS SHAIKH
Date: 2026.06.18 15:46:28 +0530

**(शबनम युनूस शेख)**

**ठिकाण – रत्नागिरी**
**दिनांक – १८/०६/२०२६.**

**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, रत्नागिरी.**
**(न्यायालय क्र.२)**

**प्रमाणपत्र**

''मी खात्रीपूर्वक असे कथन करते की, पी.डी.एफ. फाईल मधील आदेश हे मूळ आदेशाप्रमाणे तंतोतंत शब्दशः बरोबर आहे''.

लिपीकाचे नांव :– एस.एन.कुलकर्णी.

न्यायालयाचे नांव :– न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, न्या.क्र.२, रत्नागिरी.

पी.डी.एफ दिनांक :– १८/०६/२०२६

स्वा/–
लिपीक